Maya CARE Foundation
The next best thing to family

# मायाकेअर फाऊंडेशन

News Letter

✻ वार्तापत्र ✻

वर्ष : १ ले अंक : २ रा
जानेवारी - मार्च २०२२
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

आम्ही आमच्या वार्तापत्राचा पहिला अंक दिनांक १0 ऑक्टोबर २०२१ रोजी प्रकाशित केला होता, या अंकाचे मायाकेअरचे लाभार्थी, स्वयंसेवक, देणगीदार व हितचिंतक यांनी मनापासून स्वागत केले आणि हा अंक उत्तम असल्याची प्रतिक्रिया आम्हाला मिळाली. यामुळे आमचा उत्साह द्विगुणित झाला आहे आणि जेष्ठ नागरिकांची सेवा करण्यासाठी आम्ही पूर्वीपेक्षाही अधिक उत्साहाने कार्यरत झालो आहोत .

पुणे शहरात सुरु झालेली हि चळवळ आता महाराष्ट्र व इतर राज्यातील काही शहरात चांगलीच विस्तारित होत आहे याचा प्रत्यय तुम्हाला या अंकातून पुण्याबाहेरच्या फोटोमधून येईलच. एकट्या दुकट्या राहणाऱ्या तसेच अपंग वृद्धांना निरनिराळ्या पद्धतीने मदत करण्याचे आमचे काम तर चालू आहेच पण अद्याप लसीकरण न झालेल्या किंवा लसीचा एकच डोस घेतलेल्या वृद्धांना मदत करण्याचे कामही चालू आहे. याशिवाय आम्ही नुकतेच पुण्यातील दोन वृद्धाश्रमात ओरॅकल या सॉफ्टवेअर क्षेत्रातील कंपनीच्या सहकार्याने हिंदी सिने गीतांचा कार्यक्रम तेथील जेष्ठ नागरिकांच्या करमणुकीसाठी सादर केला. तसेच त्या वृद्धाश्रमातील वृद्धांना ओरॅकलच्या स्वयंसेवकांनी हाताने तयार केलेली अत्यंत सुंदर भेटकार्डे आम्ही दिली तसेच निवारा या पुण्यातील वृद्धाश्रमात आमच्या स्वयंसेवकांनी दिवाळी निमित्त मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला या दोन्ही कार्यक्रमाचे भरभरून कौतुक झाले.

आमच्याकडे महाविद्यालयीन विद्यार्थी आहेत, गृहिणी आहेत, व्यावसायिक आहेत आणि क्रियाशील असे जेष्ठ नागरिकसुद्धा स्वयंसेवक म्हणून काम करतात. आमचे स्वयंसेवक अत्यंत प्रामाणिकपणे व अत्यंत जबाबदारीने वागतात आणि  ते आपल्या कामाबद्दल अत्यंत संवेदनशील आहेत.

२०२१ च्या डिसेम्बर महिन्यात आमच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. ऑल इंडिया मॅनॅजमेण्ट असोसिएशन कडून केस स्टडी कॉम्पिटिशन मध्ये आम्हाला फर्स्ट रनर अप चे पारितोषक मिळाले. निलेश बोर्डे, अभिजित माळी आणि अर्चना चांदणे या आमच्या दिव्यांग टीम मेम्बर्सनी मायाकेअर फाऊंडेशन केस स्टडी सादर केला आणि त्याला बक्षिस मिळाले .

दोन वर्षापूर्वी आम्ही महाराष्ट्राबाहेर सेवा द्यायला सुरुवात केली. गुजराथ, राजस्थान, पंजाब, आसाम, कर्नाटक, तामीळनाडू, मध्यप्रदेश, चंदीगड, प. बंगाल आणि आंध्र प्रदेशात आता आम्ही सेवा देत असतो.

याशिवाय आम्ही भारताच्या बाहेरही सेवा द्यायला सुरुवात केली आहे. इंग्लंडने भारताला जिंकून भारतावर १५० वर्षे राज्य केले. आता आम्ही इंग्लंडला प्रेमाने जिंकून सेवा द्यायला सुरुवात केली आहे. लंडन, मँचेस्टर, केंब्रीज च सेंट अल्बान्स या ठिकाणी आम्ही सेवा देत आहोत.

नूतन वर्ष २०२२ च्या आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

# वार्तापत्राच्या प्रथम अंकाचे उद्घाटन ...

दिनांक १० ऑक्टोबर २०२१ रोजी पुणे येथे पुण्याई सभागृहात मायाकेअर फाऊंडेशनच्या वार्तापत्राच्या पहिल्या अंकाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. वार्धक्याचे शास्त्र या विषयात अनेक वर्षे काम करीत असलेल्या डॉक्टर रोहिणी पटवर्धन यांच्या हस्ते या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. समारंभाला मायाकेअर फाऊंडेशन च्या संस्थापिका सौ. मंजिरी गोखले जोशी व संचालक श्री. अभय जोशी व डॉक्टर श्री. सुरेश गोखले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन पुण्यातील एक स्वयंसेवक श्री. विद्याधर जोशी यांनी केले. या कार्यक्रमाला मायाकेअर फाऊंडेशन चे पुणे शहरातील स्वयंसेवक, बिंदू टीमचे सभासद, लाभार्थी जेष्ठ नागरिक, देणगीदार व हितचिंतक उपस्थित होते .

सभेच्या सुरुवातीला मायाकेअर फाऊंडेशनच्या संचालिका कै. विद्याताई गोखले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. डॉक्टर रोहिणी पटवर्धन यांनी आजपर्यंत जेष्ठ नागरिकांसाठी केलेल्या सेवेबद्दल त्यांना डॉक्टर सुरेश गोखले यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉक्टर रोहिणी पटवर्धन यांनी या प्रसंगी प्रत्येक जेष्ठ नागरिकाने आपला वेळ, पैसा आणि आपला अनुभव याचा उपयोग समाजातील  इतर जेष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी करावा असे आवाहन केले. त्याचप्रमाणे जे स्वयंसेवक जेष्ठ नागरिकांची सेवा करतात त्यांनी आपल्या कार्याची नोंद ठेवावी व ती प्रकशित करावी, ज्यायोगे त्याची मदत इतर स्वयंसेवकांना होईल असे सांगितले. श्री अभय जोशी यांनी आज जे तरुण आहेत ते उद्या जेष्ठ नागरिक होतील आणि त्यावेळी त्यांना अशा मदतीची गरज भासेल, त्यामुळे हे कार्य अव्याहतपणे चालू ठेवावे लागेल असे प्रतिपादन केले. सौ. मंजिरी गोखले जोशी यांनी मायाकेअर फाऊंडेशन वृद्धांसाठी काम करीत आहे आणि याचा विस्तार महाराष्ट्र तसेच इतर राज्यातील काही शहरे  एवढेच नव्हे तर भारताबाहेर इंग्लंड येथेही झाला आहेच, याशिवाय दिव्यांग तरुण तरुणींना माया केअर ने रोज़गाराची संधी उपलब्ध करून दिली आहे आणि हे दिव्यांग धड धाकट तरुणांएवढेच किंवा काही बाबतीत त्यांच्यापेक्षाही सरस काम करतात असे सांगितले. या कार्यक्रमात वयाची शंभरी पूर्ण केलेले लाभार्थी व सामाजिक कार्यकर्ते श्री माधव पारधी यांचा सत्कार डॉक्टर रोहिणी पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच मायाकेअर फाऊंडेशनचे जेष्ठ नागरिक लाभार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मायाकेअर फाऊंडेशनच्या सेवा उत्तम व अत्यंत आवश्यक आहेत असा अभिप्राय दिला. त्यांनतर अनेक वर्षे जे स्वयंसेवक सातत्याने सेवा देत आहेत त्यांचा डॉक्टर रोहिणी पटवर्धन यांच्या हस्ते  प्रशस्ती पत्रक देऊन  सन्मान करण्यात आला.

त्यानंतर बिंदू टीम मधील एक दिव्यांग तरुण श्री निलेश बोर्डे जो पूर्णपणे व्हील चेअर वर बांधलेला आहे. तरीही शारीरिक अपंगत्वावर मात करून महत्वाचे प्रकल्प सांभाळत आहे त्याने आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्याने मायाकेअर फाऊंडेशनच्या संस्थापिका सौ. मंजिरी गोखले जोशी या पारसमणी आहेत आणि आमची क्षमता पाहून त्यांनी आम्हाला बिंदू नाव देऊन सामील करून घेतले आहे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शेवटी  श्री. मकरंद निमोणकर यांनी आभार मानले व त्यानंतर अल्पोपाहार होऊन कार्यक्रम संपला.

# अग्रगण्य संस्था-मायाकेअर फाऊंडेशन...

आजकालच्या शहरी आणि धावपळीच्या जीवनात एकटे राहणारे नागरिक यांना एकाकीपणाची जाणीव अधिक वाटत असते, अशा वेळी आधारासाठी, वेळ व्यतीत करण्यासाठी, कोणी उपयोगी पडेल  काय या शोधात ती व्यक्ती आपला विचार एकमेकासमोर मांडत असते. मग समोर चित्र येते ते  वृद्धाश्रम, वृद्धांचे वसतिगृह, काळजीवाहू संस्था, केअर सेंटर यांची यादी. आणि त्यातून त्या एकटे राहणाऱ्या व्यक्तीला मनोबल मिळते. त्या अनुषंगाने माझ्यासमोर एक प्रकाश आला तो म्हणजे पुण्यात सहकार्य करणारी मार्गदर्शक संस्था मायाकेअर फाऊंडेशन.

गेली पाच वर्षे मी पुण्यात माझ्या मुलीच्या आसपास निवास करीत आहे. त्यात जेष्ठ नागरिक संघाच्या व्यासपीठावर मला या संस्थेची माहिती मिळाली. त्यांच्या फोन संपर्कात आलो. आणि या संस्थेने एकटेपणा काही अंशी कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या संस्थाप्रमुखानी अनपेक्षित माझ्याकडे श्री. अनिल नातू या सुयोग्य व्यक्तीची भेट प्रथम घडवून आणली. श्री. नातू माझ्याकडे आठवड्यातून एकदा येत असत. त्यांच्याकडून संस्थेची माहिती मिळत असे. तसेच संस्थेचे अन्य उपक्रम ते मला सांगत त्याने माझी विचारशक्ती वाढत असे. नंतर त्यांना परदेशात मुलाकडे जावे लागले. पुन्हा प्रश्न आला तो एकटेपणाचा. पण तो श्री वसंत माळी या व्यक्तीने काहीसा सोडविला. नंतर करोना व्याधीचा प्रादुर्भाव वाढत गेला आणि पुन्हा मला एकटेपणा भेडसावू लागला. एक वर्षे /दीड वर्षे मी बैचेन होतो. सदर संस्थेच्या काही महिला कार्यकर्त्यांनी फोन करून माझेशी संपर्क साधला. योगायोग असा कि माझी जन्मतारीख त्यांना पाहिजे होती म्हणून माझ्या मुलीशी सौ प्राजक्ता शेंडे यांचेशी त्यांनी संपर्क केला दरम्यान श्री नातू यांनी एका कार्यक्रमात असलेला फोटो मायाकेअरला दिला. त्यांनी फोनवरून माझे अभिष्टचिंतन केले. अशी संस्था कार्य करते. पुन्हा कोणीतरी मला भेटावे म्हणून गेल्यावर्षात प्रयत्न केला, त्याला योग्य प्रतिसाद मिळाला तो श्री विद्याधर जोशी यांच्या सहकार्याने. गेले दीडदोन महिने ते माझ्याशी हितगुज करतात, त्यातून त्यांनी आई निराधार संस्था या डॉक्टर गुप्ते व सौ डॉक्टर गुप्ते यांच्या संस्थेची माहिती सांगितली आम्ही दोघे त्या संस्थेला भेटून आलो संस्था चांगली आहे कार्य, सोयी पण चांगल्या आहेत हे सर्व श्री जोशी यांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाले आता त्याचा उपयोग कसा करून घ्यायचा हे विचारांती ठरणार, तर अशा क्षेत्रात पुण्यासारख्या अवाढव्य लोकसंख्येच्या शहरात जेष्ठ नागरिकांसाठी कार्य करीत असलेली हि संस्था समाजाला मार्गदर्शक ठरो हि प्रार्थना .

सदर संस्थेच्या संस्थापिका सौ मंजिरी गोखले जोशी तसेच इतर सहकारी प्रेरणा, अन्नपूर्णा यांनासुद्धा धन्यवाद !


श्री दादासाहेब शुक्ल,<br>
द्वारा सौ प्राजक्ता शेंडे<br>
ओम अविष्कार, स्नेह पॅराडाईज<br>
एम आयटी जवळ कोथरूड, पुणे<br>
मो -९४०४७००८४५

## FEEDBACKS FROM OUR BENEFICIARIES

मी उद्धव बागुल (वय ८८) राहणार नाना पेठ पुणे.

मला एका डोळ्याने दिसत नाही आपले स्वयंसेवक श्री महेश कुलकर्णी मला गेली दोन वर्षे सातत्याने मदत करतात. मला बँकेत, भाजीपाला आणायला, मंदिरात जायला, सोबत करतात ते रस्ता ओलांडताना माझी खूप काळजी घेतात. मी त्यांच्या बरोबर एकदा वाईला जाऊन आलो आणि माझ्या जुन्या मित्रांना आणि नातेवाईकांना भेटलो. खूप आनंद झाला आपण खूप मोठे समाजकार्य करीत आहात, आम्हाला खूप मदत होते. निश्चितच हि सेवा घ्यायला मी इतर जेष्ठाना शिफारस करेन .

---

Mrs Billimora Wanowrie.
Maya Care,
It is a good service, It is very necessary now a days.
Ravi Chabra is helping me in Bankwork and reading as and when required.

---

**सन २०२१ मध्ये आम्ही सेवा देत असलेल्या खालील जेष्ठ नागरिकांचे दुःखद निधन झाले.**

# || भावपूर्ण श्रद्धांजली ||

**श्री. अरुण गाडगीळ**
**श्री. प्रभाकर ताम्हणकर**
**श्री. हरीश बेलानी**
**श्रीमती मेरी पीटर**
**श्री. अतुल ओरपे**
**श्री. सुरेश काणे**



**या सर्वांना**
**भावपूर्ण श्रद्धांजली**



# एका स्वयंसेवकाचा अनुभव...

मी २०१३ सालापासून एका वृद्धाश्रमात वृद्धांना मदत करण्यासाठी जात असतो . २०१५ मध्ये एक वृद्धा श्रीमती राजापूरकर (नाव मुद्दामून बदलले आहे) माझ्याकडे आल्या आणि त्यांनी त्यांचा जीवनवृत्तान्त थोडक्यात सांगितला. त्यांच्या वडिलांच्या अकाली निधनानंतर वडिलांचा लाऊडस्पीकर भाड्याने देण्याचा व्यवसाय सांभाळून, त्यांनी लहान दोन बहिणी व धाकटा भाऊ यांचे शिक्षण व लग्न करून दिले आणि त्यासाठी त्या अविवाहित राहिल्या. त्या रहात होत्या ती जागा भाड्याची होती व ती इमारत मोडकळीस आल्याने इमारतीच्या मालकाने त्याचा पुनर्विकास करण्याचे ठरविले व त्यासाठी त्यांची दुसरीकडे राहण्याची सोय केली. बिल्डर बरोबरचा करार त्यांच्या धाकट्या भावाशी झाला होता आणि नवीन इमारत पूर्ण होताच त्यांच्या भावाने सांगितले कि करार माझ्या एकट्याच्या नावाने आहे तेव्हा तू काही आता येऊ नकोस .

मग या आजी वृद्धाश्रमात राहू लागल्या व त्यांनी बिल्डरला नोटीस पाठविली कि फ्लॅट व दुकानाचा ताबा मला व माझ्या भावाला मिळून संयुक्तपणे दयावा. बिल्डरने दोन वर्षे कोणालाच ताबा दिला नाही, पुढे त्यांनी मला सांगितले, कि त्यांना नुकतेच समजले आहे कि बिल्डरने त्यांच्या भावाला फ्लॅट व दुकानाचा ताबा दिला आहे, तर याबाबत काही करता येईल का? मग आम्ही बिल्डरला फोन केला आणि याबाबत विचारणा केली, तेव्हा त्याने असे सांगितले कि स्थानिक नगरसेवकाने माझेवर दडपण आणले आहे म्हणून कराराप्रमाणे मी फ्लॅट व दुकानाचा ताबा दिला. मग आम्ही त्या नगरसेवकाकडे गेलो तेव्हा त्या नगरसेवकाने सांगितले कि कायद्यानुसार त्याच्या एकट्याबरोबर करार झाला आहे, त्यामुळे मी बिल्डरला करारानुसार त्याला ताबा द्या असे सांगितले. आम्ही तेथे जाणेपूर्वी एका नामवंत वकिलाचा सल्ला घेऊनच गेलो होतो त्यामुळे त्याच्या बरोबर त्या आजींच्या बाजूचे जे मुद्दे होते ते मांडले, मग त्याने आजींच्या भावाला बोलावून घेतले. सात-आठ वेळा चर्चा झाली आणि त्यांच्या भावाने वृद्धाश्रमाची दरमहा भरावी लागणारी रक्कम अधिक औषधपाणी व इतर खर्चासाठी म्हणून दरमहा पाच हजार रुपये देण्याचे मान्य केले.

मग वकिलाच्या सल्ल्याने एक करारपत्र करून ते नोटराईज केले व त्यावर साक्षीदार म्हणून बिल्डरच्या सह्या घेतल्या. त्या करारानुसार आजींचा खर्च दरमहा रुपये पाच हजार तो त्यांच्या बँकेच्या खात्यात भरत होता. दोन वर्षांपूर्वी त्या आजींचे निधन झाले.

विद्याधर जोशी
मायाकेअर फॉउंडेशन,
पुणे स्वयंसेवक

<u>ज्येष्ठांसाठी हेल्पलाईन</u>

★ प्रोजेक्ट मुंबई - 9879508404
★ सिल्व्हर इनिंग्ज - 9029000091
★ हेल्पेज इंडिया - 18001801253
★ आदित्य प्रतिष्ठान - 9004782919/8291087192
★ पुणे पोलिस ज्येष्ठांसाठी - 1090

**आजोबा म्हणजे अशी व्यक्ती जी नातवाचा पहिला मित्र असते.**



आमचे पुण्याचे स्वयंसेवक रवी छाब्रा श्रीमती बिलिमोरा
यांना सेवा देत असताना .




आमचे नागपूरचे स्वयंसेवक श्री कुणाल मोटघरे हे
श्री. माणिक ताजने यांना मदत करताना .



दिनांक १० ऑक्टोबर २०२१ रोजी वार्तापत्राच्या पहिल्या
अंकाचे डॉक्टर रोहिणी पटवर्धन प्रकाशन करताना.



सामाजिक कार्यकर्ते श्री पारधी यांनी वयाचे शतक पूर्ण
केल्याबद्दल त्यांचा डॉक्टर रोहिणी पटवर्धन यांनी
सत्कार केला त्यावेळचा फोटो.



श्री पारधी पतिपत्नी सोबत माया केअरचे संस्थापक
सौ. मंजिरी गोखले जोशी व अभय जोशी.




ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन तर्फे माया केअरच्या
प्रोजेक्ट बिंदू च्या केस स्टडीला पहिले रनर अप चे
पारितोषिक मिळाले.



वर्धा येथील आमचे एक स्वयंसेवक श्री आशिष वाटकर
एका वृद्धेला सेवा देत असताना.



आमच्या वर्धा येथील स्वयंसेविका पूनम वाटकर
एका वृद्धेची सेवा करताना.




आमचे पुण्याचे स्वयंसेवक श्री. नेरकर विशेष सेवेबद्दल
डॉक्टर रोहिणी पटवर्धन यांचेकडून प्रशस्तीपत्र स्वीकारताना.



आमचे स्वयंसेवक श्री महेश कुलकर्णी जेष्ठ नागरिक
श्री चंद्रकांत केळकर यांचेशी कल्पवृक्ष केअर सेंटर येथे
वार्तालाप करीत असताना.



आमचे स्वयंसेवक श्री ज्ञानेश्वर शिंदे वर्धा येथे
जेष्ठ नागरिकांना औषधे आणून देत असताना.



आमचे यवतमाळचे स्वयंसेवक अंजनाबाई भोजेवाड यांना
औषध आणून देत असताना.




आमचे स्वयंसेवक श्री. महादेव चौधरी यवतमाळ येथे जेष्ठ
नागरिकाला दवाखान्यात मदत करताना.



श्रीमती पार्वती जिरे यांना आमचे स्वयंसेवक
किराणा माल आणून देत असताना.



आमच्या स्वयंसेविका श्रीमती विनिता महाजन पुणे येथे
पालकर आजी याना बँकेच्या कामासाठी मदत करताना.



आमच्या स्वयंसेविका श्रीमती वीणा जोग पुणे येथे अभंग
आजी यांचेशी आजारपणात वार्तालाप करीत असताना.

Maya CARE Foundation

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत ९० मिनीटांच्या भेटी

**सेवा :**

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत करा

## MAYA CARE FOUNDATION (INDIA) HELPLINE NUMBERS

| CITY | HELPLINE NO. |
|---|---|
| Pune, Mumbai, Kolhapur, Nagpur, Nasik, Sangli, Solapur, Ahmednagar, Nandurbar, Aurangabad, Buldhana, Akola, Jalgaon, Amravati, Bhopal, Jodhpur, Halkhandi, Guwahati, Jalandhar, Udaipur | 9552510400<br>9552510411<br>9623571845 |
| Bengaluru / Belagavi | 7975444324 / 9576729421 |
| Vadodara / Ahmedabad | 7069070728 |
| Trichy | 8072700728 / 8608936279 |
| Chennai | 9884360855 |
| Chandigarh | 7814510551 / 6284735855 |
| Kolkata | 9903798481 / 7605037322 |
| Hyderabad | 9321787708 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
ACCOUNT NO. : 187501000462
IFSC CODE : ICIC0001875

PRINTED MATTER

बुक-पोस्ट

FROM,

**माया केअर फाऊंडेशन**
१२१४ शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.०४, पुणे - ४११००२.
केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

TO,

श्री / श्रीमती ____________________

____________________

____________________

____________________

____________________